# बातमीपत्र - जानेवारी २०२६

**जपूया संस्कृती, विणूया नाती**

**६-९ ऑगस्ट २०२६, सिॲटल्**




बीएमएम२०२६ सिॲटल्- बातमीपत्राच्या सर्व वाचकांना नमस्कार. सर्वांना नववर्षाच्या आणि मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा! २०२५ वर्ष बघता बघता संपलं देखील. गतवर्षीच्या अनेक आठवणी, अनुभव तसेच नवीन स्वप्नं सोबत घेऊन आपण नववर्षात पाऊल टाकले आहे. आणि हो, बीएमएम२०२६ची तयारी सुद्धा आता आणखी जोमात सुरू झाली आहे!

**आनंदाची बातमी!** 🎉 येत्या मकर संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर नोंदणी आणि तिकीट विक्री अर्थातच Registration सुरु होत आहे. Stay Tuned! याच वेळी आम्ही आगामी काही महत्त्वाचे कार्यक्रम, उपक्रम आणि आकर्षणेही जाहीर करणार आहोत. नवीन वर्ष म्हणजे नवी ऊर्जा आणि बीएमएम२०२६च्या प्रवासाच्या तिसऱ्या टप्प्यातील नवी सुरवात! ह्या प्रवासात या बीएमएम२०२६च्या केंद्रस्थानी आहे – **'ती' चा सन्मान, स्त्रीत्वाचा गौरव – Celebration of Womanhood.** 💐 🙏🏻

ती म्हणजे उर्मी, उर्जा, प्रीती, महत्वाकांक्षा, जबाबदारी, ती आपली मायभूमी, मायबोली, आपली संस्कृती, अस्मिता; माता, भगिनी, मुलगी, बायको, प्रियसी, मैत्रीण. ती जी आपल्याला पहिलं बाळकडू देते, जी नाती विणायला शिकवते, जी आपल्याला जगायला शिकवते, आणि आपल्याला घट्ट जोडून ठेवते, तीच आहे आपली ओळख, तीच आहे आपली शक्ती! ती संस्कृतीचा आधारस्तंभ आहे. नात्यांची वीण, मूल्यांची शिदोरी, आणि पुढच्या पिढीची दिशा — हे सगळं तिच्याच हातात असतं. त्यासाठी **'ती' चा सन्मान**!!! बीएमएम२०२६ मध्ये केवळ साडेतीन दिवसांचे कार्यक्रम नसून एक असा प्रवास असावा जो स्थानिक मराठी मंडळांपासून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मराठी समुदायाला एका समान धाग्याने जोडेल. आणि ह्याचाच भाग म्हणून आम्ही जानेवारीपासून दर महिन्याला स्त्रीत्वाचा सन्मान करणार आहोत. ह्या सन्मानासाठी भारतामधील आपापल्या क्षेत्रात नाव कमावलेल्या आणि अमेरिकेतील आपल्या आसपासच्या, आपल्यातल्याच प्रेरणादायी, कर्तृत्ववान स्त्रियांना आम्ही मानचिह्न देऊन पुरस्कृत करू. हा सन्मान पुढील पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी वारसा ठरेल.

बीएमएम२०२६ मध्ये असणार आहेत, विविध वयोगटांसाठी, विविध आवडींसाठी स्पर्धा. कला, साहित्य, संगीत, सादरीकरण, सर्जनशीलता — प्रत्येकासाठी काहीतरी खास! सर्व स्पर्धांची तसेच उद्योग महोत्सव – EXPO बद्दलची माहिती आमच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

बीएमएम२०२६ यशस्वी करण्यासाठी आपले देणगी स्वरूपातले योगदान अत्यंत मोलाचे आहे. तुम्ही अजून देणगी पॅकेज विकत घेतलं नसेल तर लवकरात लवकर घ्या. ह्याबद्दलची सर्व माहिती आमच्या संकेतस्थळावर **https://bmmseattle2026.org/individual-donor-package-tiers** आणि समाजमाध्यमांवर (social media) उपलब्ध आहे. अधिक माहिती वा शंका निरसनासाठी ह्या इमेल-पत्त्यावर संपर्क साधावा - **donations@bmmseattle2026.org**

स्नेहसंमेलनाच्या यशासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची नितांत गरज आहे. त्यामुळे तिकीट विक्री चालू होताच लवकरात लवकर आपली नोंदणी करा. जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हा, आपल्या कुटुंबीयांना, मित्रांना सोबत आणा, आणि बीएमएम२०२६चा अविस्मरणीय आनंद अनुभवायला सिॲटल् ला नक्की या!

आपण संमेलनाशी संबंधित बातम्या, घडामोडी आणि गमती जमती आमच्या समाजमाध्यमांतून बघू शकता.

**संकेतस्थळ:** **https://bmmseattle2026.org**

**युट्युब चॅनेल:** **https://www.youtube.com/@BMM2026SEATTLE**

**फेसबुक पेज:** **https://www.facebook.com/bmm2026seattle**

**फेसबुक ग्रुप:** **https://www.facebook.com/groups/bmm2026seattle**

**इंस्टाग्राम:** **https://www.instagram.com/bmm2026seattle**

**इमेल-पत्ता:** स्नेहसंमेलनासंबंधीच्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी–

**info@bmmseattle2026.org**

आपली साथ, आपला सहभाग - हाच आमचा खरा उत्साह आहे. 🙏 🌸

अश्विनी क्षीरसागर,

(बीएमएम२०२६ समिती)